## प्रेसनोट

जा.क्र. ३१ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :– १६/१२/२०१७

## "विनयभंग गुन्हयात आरोपीस एक वर्ष, सहा महिणे कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"

पोलीस ठाणे लाखनी अंतर्गत ग्राम सिंदीपार/मुंडीपार तालुका लाखनी येथिल पिडित महिला, वय ४० वर्ष हि आपले शेतात एकटी धान कापीत असतांना गुन्हयातील आरोपी नामे लशिकचंद धनलाल पटले, वय ४० वर्ष रा. सिंदीपार/मुंडीपार याने पिडित महिलेस शेतात एकटीच काम करीत असल्याचे पाहुन तीचे मागेहुन जावुन पिडित महिलेला दोन्ही हाताने कवटाळुन शारिरीक सुखाची मागणी करून विनयभंग केला त्यावर महिलेने प्रतिकार केला असता पिडित महिलेस जिवानीशी ठार मारण्याची धमकी दिल्याने, पिडित महिलेने घडलेल्या घटणेसंबंधी पोलीस ठाणे लाखनी येथे तोंडी तक्रार दिल्यावरून तात्काळ अपराध क्र. १४८/१५ कलम ३५४ (अ) (२), ५०६ भादवि अन्वये दिनांक १५/११/२०१५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस उपनिरीक्षक टेभुर्णीकर, पो.स्टे. लाखनी यांनी सुरू केला. गुन्हयात आरोपीस अटक करून साक्षपुरावे गोळा केले आणि प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, लाखनी येथे आरोपी विरूध्द आरोप पत्र दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. २२/१६ अन्यवे न्यायाधिश सा. यांचे समक्ष सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी **मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी श्री. ए. डी. मारगोडे सा.** यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्रीमती एस. यु. मेश्राम, सहा. सरकारी अभियोक्ता**, प्रथम श्रेणी न्यायालय, लाखनी यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. दिनांक १६.०१.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी नामे लशिकचंद धनलाल पटले, वय ४० वर्ष रा. सिंदीपार/मुंडीपार** विरूध्द दोषसिध्द झाल्याने कलम ३५४ (अ) (२), ५०६ भादवि अन्वये एक वर्ष, सहा महिणे सश्रम कारावास व

१०,०००/– रूपये दंड, दंड न भरल्यास २ महिणा कारवासाची शिक्षा सुनावण्यात आली. सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक सोळसे यांचे मार्गदर्शनात पो.ना. सुनिल राउत, ब.नं. ६३६ व पो.ना. मनोहर शहारे, ब.नं. ८९० यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

(एस.व्ही.कुलकर्णी)
पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी क्र.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.